# रे.क.नं. १८७/२०१५ मधील निशाणी १७ वरील आदेश

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज विना कैफियत व विना म्हणणेचा हुकूम रद्द होवून कैफियत व नि.क्र. ५ च्या अर्जास म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जामध्ये प्रतिवादीने वादीचे दावेस कैफियत व नि.क्र. ५ च्या अर्जास म्हणणे न दिल्याने प्रतिवादी यांचेविरुध्द मे. कोर्टानी ''विना कैफियत'' चा आदेश पारीत केलेला आहे. परंतु प्रतिवादी या कामात वकीलामार्फत हजर झालेले आहेत. तथापि, प्रतिवादी हे नोकरीस असल्याने व त्यांना वेळेवर रजा न मिळालेने प्रस्तुत दावेसंबंधी महसूल कोर्टाकडून वेळेवर कागदपत्र उपलब्ध न झालेने वादीचे दावेस कैफियत व मनाई अर्जास म्हणणे मुदतीत तयार करुन सादर करता आले नाही. प्रस्तुत कामी कैफियत व म्हणणे दाखल करणेस जानून बुजून टाळाटाळ केलेली नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करुन प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतलेस प्रस्तुत दावेचे कामी अंतिम न्यायनिर्णय होणेस मदत होणार आहे. तसेच यातील वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. उलट प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन न घेतलेस प्रतिवादी यांना न्यायहक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी हे त्यांच्याविरुध्द झालेला ''विना कैफियत'' चा हुकूम रद्द करुन कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मागत आहे.

३. वादी यांनी म्हणणे देवून प्रतिवादी यांनी विना कैफियत चा हुकूम रद्द करुन व विलंब माफीचा अर्ज एकत्रच दाखल केले आहेत. त्यामुळे कायदयाने सदर अर्ज चालणेस पात्र नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करणेत यावा. जर अर्ज मंजूर करणेचा झालेस विलंब एक वर्षे पाच महिन्यांचा असलेने रुपये २,०००/- इतकी कॉस्ट वादींना देण्यात यावी अशी विनंती केली आहे, असे कथन केले आहे.

४. वादीतर्फे वकील श्री.विजय कडुकर यांचा युक्तिवाद ऐकला तर प्रतिवादीतर्फे वकील श्री.एस.व्ही.पोवार यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अनुक्रमे अर्ज व म्हणण्यातील मजकुरानुरुप युक्तिवाद केला.

५. सदरचा दावा वादी यांनी हक्कज्ञापन, कायम मनाई, आज्ञार्थी हुकूम, कब्जेसाठी दाखल केला आहे. यातील प्रतिवादी यांचेविरुध्द ''विना कैफियत'' चा हुकूम झालेला आहे. सदर झालेला हुकूम रद्द करुन प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर झालेला हुकूम रद्द न करुन कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी न दिलेस प्रतिवादी यांना त्यांचे बचावास संधी दिली नाही तर त्यांना न्याय्य हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे सदर परवानगी मिळणे न्यायोचित आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला ''विना कैफियत'' चा हुकूम रद्द करुन कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेस प्रतिवादी पात्र आहे. सबब, सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रुपये ३००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च अंतिम निकालावर अवलंबून राहील.

सही/-
**(एच.व्ही.कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांक- २०.०६.२०१७